

जागतिक दर्जाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ... पान 2

दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १७९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१० फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## विदर्भात ऐतिहासिक गुंतवणूक, तीन दिवसांत तब्बल ४५ हजार कोटींचे करार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, नागपूर :** 'विदर्भामध्ये १० हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, अडीच हजार मुलांचा कुपोषणामुळे मृत्यू झाला. ही परिस्थिती बदलविण्याच्या ध्येय्यातून विदर्भाच्या परिवर्तनाचा हा प्रवास सुरू झाला आहे. माओवादाची राजधानी म्हटल्या जाणारे गडचिरोली आज स्टील हब म्हणून उदयास येत आहे. तब्बल ७.५ लाख कोटींची गुंतवणूक तिथे होत आहे. वाघ्र पर्यटन वाढले आहे. वाघांची संख्या इतकी झाली आहे की, येथील वाघ दुसऱ्या राज्यांमध्ये पाठवावे लागत आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.



आजपासून पाच वर्षांपूर्वी गडचिरोलीतील मुले ऑस्ट्रेलियाम ध्ये शिकायला जाणार आहेत, असे कुणी सांगितले असते तर मी हसलो असतो. मात्र, आज हा बदल दिसून येतोय. येत्या तीन वर्षांमध्ये नागपूरातील घराघरात पाइपलाइनद्वारे गॅसचा पुरवठा होणार आहे. मिहानचा विस्तार करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली आहे. त्यानुसार अतिरिक्त १० हजार एकर जागेत मिहानचा विस्तार होणार आहे. ॲडव्हांटेज विदर्भाचे व्यासपीठ हे राजकीय नसून विदर्भाच्या विकासाचा दृष्टीकोन मांडणाऱ्यांचे आहे, त्यातूनच विदर्भाचे चित्र बदलत आहे', असं नितीन गडकरी म्हणाले.

असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटद्वारे (एआयडी) आयोजित ॲडव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाचा समारोपीय सोहळ्यामध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी बोलत होते. व्यासपीठावर केंद्रीय एमएसएमई राज्यमंत्री शोभा करंदलाजे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार डॉ. आशिष देशमुख, नीती आयोगाचे सदस्य पद्मविभूषण डॉ. व्ही. के. सारस्वत, महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड, महापालिका सत्तापक्ष नेते बाल्या बोरकर, माजी मंत्री सुलेखा कुंभारे आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविकपर भाषणात एआयडीचे अध्यक्ष आशिष काळे मागील तीन दिवसांमध्ये २२ विद्यार्थ्यांच्या पेटेंट्सला साडेपाच कोटींचे फंडिंग झाल्याचे सांगितले. सूत्रसंचालन आसावरी गलांडे यांनी केले. आभार एआयडीचे सचिव डॉ. विजय शर्मा यांनी मानले.

**● निर्यातीमध्ये एमएसएमईचे ४५ टक्के योगदान**

कृषीनंतर सर्वाधिक रोजगार देणारे क्षेत्र हे एमएसएमई आहे. देशाच्या दरडोई उत्पन्नात ३१ टक्के तर निर्यातीमध्ये ४५ टक्के योगदान एमएसएमईचे आहे. ७.५ कोटी एमएसएमईंच्या माध्यमातून ३३ कोटी रोजगार निर्मिती झाली आहे, अशी माहिती केंद्रीय एमएसएमई राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी दिली. तसेच भारतीय उद्योजकांनी निर्यातक्षम उत्पादन करत जागतिक स्पर्धेत स्वत:चे अस्तित्व निर्माण करायला हवे, असे आवाहन केले.

**● लेटर ऑफ इंटेंट, सामंजस्य करार व सत्कार**

समारोपीय कार्यक्रमादरम्यान एड-टेक क्षेत्रात लर्न कोच आणि असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट अंतर्गत लर्निंग स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. सुनील फेरो अँड इंजिनीअरिंग प्रायव्हेट लिमिटेड विदर्भात ५ हजार कोटींची गुंतवणूक करणार असून या माध्यमातून सुमारे १,५०० प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे, अशी माहिती देण्यात आली. तसेच आरोह हॉस्पिटॅलिटी आणि महिंद्रा सिग्नेचर यांच्यात ताडोबा आणि पेंच येथे पंचतारांकीत रिसॉर्ट उभारणीसाठी सामंजस्य करार झाला. एनएमआरडीएसोबत १,२०० कोटींची गुंतवणूक करणार असल्याबद्दल व्हीआयपीएलचे प्रशांत उगेमुगे यांचा सत्कार करण्यात आला. ग्रेटा एनर्जी लिमिटेडचे अनुप गोयल यांना २ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी सन्मानित करण्यात आले.

**● गडचिरोलीच्या विद्यार्थ्यांची ऑस्ट्रेलियाकडे झेप**

गडचिरोली जिल्ह्यातील १८ विद्यार्थी मायनिंग अँड मेटलर्जी अभियांत्रिकी शिक्षणासाठी ऑस्ट्रेलियातील कर्टिन युनिव्हर्सिटी येथे रवाना होणार आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांना बोर्डिंग पास प्रदान करण्यात आले. हा उपक्रम लॉइड मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडच्या सीएसआरमधून होत आहे.

## मराठमोळ्या विश्वजेत्या कर्णधार आयुष म्हात्रेला सचिन तेंडुलकरकडून विशेष भेट!

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, मुंबई :** भारतीय क्रिकेट विश्वात सध्या एकाच नावाची चर्चा आहे, ती म्हणजे १९ वर्षांखालील (U-19) विश्वचषक जिंकून देणारा कर्णधार आयुष म्हात्रे. या ऐतिहासिक विजयानंतर, विरारच्या या सुपुत्राचा आनंद द्विगुणित झाला आहे. क्रिकेटचा देव मानल्या जाणाऱ्या भारतरत्न सचिन तेंडुलकर यांनी आयुषला आपल्या घरी आमंत्रित करून एक विशेष स्वाक्षरी केलेली जर्सी भेट म्हणून दिली आहे.




भारतात परतल्यानंतर, सचिन तेंडुलकर यांनी आयुष आणि त्याच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी सचिनने त्याला भारतीय संघाची एक जुनी आठवण म्हणून आपली स्वाक्षरी असलेली 'सहारा' लोगो असलेली पांढरी जर्सी भेट दिली. या जर्सीवर सचिनने आयुषसाठी खास संदेश लिहीत त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## लालपरीच्या ताफ्यात लवकरच दाखल होणार 'राजमाता जिजाऊ बस'

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०९, मुंबई :** महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाला नेहमीच आधुनिकतेची जोड देण्यात आली आहे. याच आधुनिकतेची कास धरत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन एसटीच्या ताफ्यात अत्याधुनिक आणि अधिक आसनक्षम बसेस समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या बसेसना हिंदवी स्वराज्याची जननी असलेल्या 'राजमाता जिजाऊ' यांचे नाव देण्यात आले आहे. यामुळे एसटीच्या सेवेला ऐतिहासिक सन्मानाची जोड मिळणार आहे. राज्यात ग्रामीन भागातील सार्वजनिक वाहतुकीचे मुख्य माध्यम असलेली एसटी आता नव्या रुपात प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे. शिवशाही आणि शिवनेरीनंतर आता एसटीची राजमाता जिजाऊ बस प्रवाशांच्या सेवेत येणार आहे. ही नवीन बस लवकरच एसटीच्या ताफ्यात दाखल होणार असल्याची अधिकृत माहिती एसटी महामंडळाकडून देण्यात आली आहे.

राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिलेल्या माहितीनुसार, गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना उभ्याने प्रवास करावा लागू नये यासाठी ३ बाय २ आसन रचनेच्या तब्बल ५५ आसनी नव्या बसेस खरेदी करण्यात आल्या आहेत. या बसेस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहेत. भगव्या आणि पांढऱ्या शुभ्र रंगसंगतीत सजलेल्या या बसेस महाराष्ट्राच्या परंपरेचे प्रतीक ठरणार आहेत.




मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य संकल्पनेमागे उभ्या राहिलेल्या राजमाता जिजाऊ या प्रेरणास्थान आहेत. त्या हिंदवी स्वराज्याच्या जननी आहेत. त्यांच्या स्मरणार्थ एसटीच्या या नव्या बसेसना 'राजमाता जिजाऊ' असे नामकरण करण्यात आले आहे. यापूर्वी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती, हिरकणी अशा नावांनी एसटीच्या बसेस ओळखल्या जात होत्या. आता या परंपरेत आणखी एका गौरवशाली नावाची भर पडली आहे.

दरम्यानसध्याच्या अनेक एसटी बसेसमध्ये साधारणतः ४० प्रवाशांची आसन क्षमता आहे. नव्या 'राजमाता जिजाऊ' बसेसमध्ये मात्र ५५ प्रवासी आरामात बसू शकणार आहेत. त्यामुळे गर्दीच्या मार्गांवर उभ्याने प्रवास करणाऱ्या सुमारे १५ प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गांवर या बसेस सुरू करण्याचा एसटी महामंडळाचा विचार आहे.

'राजमाता जिजाऊ' हे नाव केवळ नामकरणापुरते मर्यादित नसून स्वराज्याचे संस्कार, मातृशक्तीची प्रेरणा आणि प्रवाशांच्या सोयीसाठीची एसटीची बांधिलकी यांचे प्रतीक असल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले. इतिहासाचा सन्मान आणि आधुनिक सुविधांचा मेळ साधत या बसेस लवकरच महाराष्ट्राच्या रस्त्यांवर धावतील अशी माहिती जनसंपर्क अधिकारी अभिजीत भोसले यांनी दिली.

## कांदा दर घसरल्याने शेतकरी अडचणीत; तातडीने उपाययोजना करा!

### सभापती ज्ञानेश्वर जगताप यांचे केंद्र व राज्य सरकारला साकडे

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०९, लासलगाव (नाशिक) :** कांद्याच्या बाजारभावात होणारी सततची घसरण थांबवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी लासलगाव बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर जगताप यांनी निवेदनाद्वारे केली आहे. वाढीव आवक आणि देशांतर्गत मागणीत घट झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, सरकारने तातडीने पावले उचलण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**बाजारपेठेतील सद्यस्थिती आणि आव्हाने**

दरांमध्ये मोठी घसरण : लासलगाव बाजार समितीत सध्या कांदा किमान ५०० रुपये, कमाल १४८५ रुपये, तर सरासरी ११०० रुपये प्रति क्विंटल दराने विकला जात आहे.

**उत्पादन खर्चापेक्षा कमी भाव :** सध्याचा सरासरी भाव पाहता शेतकऱ्यांना प्रति क्विंटल सुमारे ६०० ते ७०० रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे.

**आवक वाढली :** महाराष्ट्र, गुजरात आणि मध्य प्रदेशात कांदा उत्पादनात ३० ते ४० टक्क्यांनी वाढ झाल्याने मागणी व पुरवठ्याचे गणित बिघडले आहे.

**साठवणूक मर्यादा :** सध्याचा खरीप व लेट खरीप कांदा साठवणुकीस योग्य नसल्याने शेतकऱ्यांना मिळेल त्या भावात कांदा विकावा लागत आहे.

**शासनाला सुचविलेल्या प्रमुख उपाययोजना :**

सभापती ज्ञानेश्वर जगताप यांनी निवेदनातून केंद्र व राज्य सरकारकडे खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत :

● बांगलादेश निर्यात मार्ग मोकळा करा : बांगलादेशशी चर्चा करून तेथील बँक हमीपत्र पूर्ववत सुरू करावे आणि निर्यात सीमा खुल्या कराव्यात.

● नवीन बाजारपेठांचा शोध : फिलिपिन्स, जॉर्डन, युरोप आणि ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांमध्ये निर्यात वाढवण्यासाठी ठोस निर्यात धोरण आखावे.

● नाफेडमार्फत खरेदी : किंमत स्थिरीकरण निधी अंतर्गत 'नाफेड'मार्फत तातडीने कांदा खरेदी सुरू करावी.

● वाहतूक सुविधा : 'किसान रेल' किंवा स्वतंत्र रेल्वे सेवेद्वारे कांद्याची वाहतूक ४८ ते ६० तासांत करण्याची व्यवस्था करावी.

> अवकाळी पाऊस आणि घसरलेले बाजारभाव यामुळे कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे. ठिकठिकाणी आंदोलने होत असून, शेतकऱ्यांचा रोष कमी करण्यासाठी सरकारने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे.
>
> **- ज्ञानेश्वर जगताप, सभापती लासलगाव बा.समिती**

● थेट अनुदान (भावांतर योजना) : निर्यातीवरील शुल्कातून एक स्वतंत्र 'भावांतर फंड' तयार करून, बाजारभाव कमी असताना फरकाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी.

● निर्यात सवलती : कांदा निर्यातदारांना निर्यात कर परतावा वाढवून द्यावा.

हे निवेदन केंद्रीय मंत्री पियुष गोयल, निर्मला सीतारामन, एस. जयशंकर, शिवराज सिंह चौहान, तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, छगन भुजबळ आणि अन्य संबंधित मंत्र्यांना पाठवण्यात आले आहे.

## राहुरीत रात्री मोबाईल, टीव्ही बंद करण्याचा निर्णय !

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०९, राहुरी :** सध्याच्या धकाधकीच्या जीवनशैलीत पालकांना आपल्या मुलांसाठी व कुटुंबासाठी पुरेसा वेळ देता येत नसल्याने मुलांमध्ये मोबाईल, टीव्ही व सोशल मीडियाचे व्यसन वाढत असल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे मुलांवर चांगले संस्कार होण्यासाठी कुटुंबातील संवाद वाढणे गरजेचे असल्याचे मत नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांनी व्यक्त केले.

राहुरी नगरपरिषदेत नुकत्याच झालेल्या बैठकीत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, सायंकाळी सात वाजता नगरपरिषदेचा सायरन वाजल्यानंतर रात्री साडेआठपर्यंत म




ोबाईल, दूरदर्शन व इतर मनोरंजनाची साधने बंद ठेवावीत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या कालावधीत शालेय विद्यार्थी व पालकांनी एकत्र बसून अभ्यास, वाचन तसेच कुटुंबीयांशी संवाद साधावा, असा संदेश देण्यात आला आहे.

आजच्या युगात मोबाईलचा अति वापर, टीव्ही व सोशल मीडियाच्या सवयीमुळे तरुण पिढी मोठ्या प्रमाणात भरकटत असल्याचे दिसून येत आहे. पालक व मुलांमधील संवाद कमी होत चालला असून, मुलांना चांगले-वाईट यातील फरक समजावून सांगण्यासाठी वेळ देणे आवश्यक असल्याचेही नगराध्यक्ष मोरे यांनी नमूद केले.

हा निर्णय कठोर वाटत असला तरी मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी व कुटुंबातील नातेसंबंध अधिक दृढ करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. नगरपरिषदेच्या सभेत हा विषय एकमताने मंजूर करण्यात आला असून, नागरिकांनी या उपक्रमाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



# जागतिक दर्जाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ !!

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातीलच नाही तर जगातील एक नावाजलेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजी झाली म्हणजे आज हे विद्यापीठाला ७७ वर्ष पूर्ण होऊन ७८ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. डॉ एम आर जयकर हे या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. स्थापनेनंतर १२ जिल्ह्यांमध्ये उच्च शिक्षणाच्या विविध सुविधा पुरवण्याची जबाबदारी पुणे विद्यापीठावर होती. १९६४ मध्ये कोल्हापूर येथे छत्रपती शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पुणे, नाशिक, धुळे, जळगाव या जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचे कार्य सुरू झाले. १९९० साली जळगाव येथे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर पुणे, नगर, नाशिक या जिल्ह्यांसह दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील महाविद्यालये या विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहेत. २०१४ साली या विद्यापीठाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला. पुण्यातील गणेशखिंड रस्त्यावर पुणे विद्यापीठाचे मुख्य संकुल आहे. विद्यापीठाची मुख्य इमारत पुणेकरांसाठी शैक्षणिक अस्मितेचे प्रतीक आहे. ही इमारत ब्रिटिश गव्हर्नरांच्या पुण्यातील मुक्कामासाठी एकोणिसाव्या शतकात बांधण्यात आली होती. इटालियन शैलीत बांधण्यात आलेली ही इमारत म्हणजे पुण्याला मिळालेला ऐतिहासिक वारसा आहे. विद्यपीठाचा परिसर सुमारे ४९० एकराचा असून त्यात अनेक दुर्मिळ सुंदर आणि अतिशय मनमोहक असे वातावरण लाभले आहे. घनदाट जंगल, शोभिवंत हिरवळ, दुर्मिळ ब्रिटिशकालीन कारंजे व ऐतिहासिक अशी ब्रिटिशकालीन भव्य इमारत यामुळे हा परिसर निसर्गप्रेमी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक यांचे आकर्षण केंद्र राहिला आहे. पुणे विद्यापीठात दुर्मिळ तसेच सावली देणारे मोठे वृक्ष आहेत. या वृक्षांची छाया, सौंदर्य आणि उत्साह निर्माण करणारे वातावरण विद्यार्थ्यांना अभ्यास व संशोधन करण्यास प्रोत्साहित करते. विद्यापीठातून विविध पदव्युत्तर विभाग व प्रशासकीय कार्यालयाचे कामकाज चालते. या विभागातून आज जवळपास ६ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ४२ शैक्षणिक विभाग, १२ आंतरविद्या शाखा व सेवा युनिट, २० अध्यासने, ८ राष्ट्रीय व प्रादेशिक केंद्र आहेत. ६९६ संलग्न महाविद्यालये, २८७ मान्यताप्राप्त व्यवस्थापन संस्था, १२१ मान्यताप्राप्त संशोधनकेंद्र विद्यापीठाशी संलग्न आहेत. विद्यापीठातील विविध विभागात ६० हुन अधिक देशातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आपल्या विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठातील अभ्यासक्रमाचेही फायदे व्हावेत यासाठी गेल्या काही काळात विद्यापीठाने परदेशातील नामांकित विद्यापीठांसोबत सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ जयकर यांच्या नावाने ओळखले जाणारे जयकर ग्रंथालय केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर विद्यापीठाबाहेरील संशोधक व अभ्यासकांनाही खेचून आणते. जयकर ग्रंथालय हे माहिती आणि संदर्भ ग्रंथासाठी भारतातीलच नव्हे तर जगातील जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथालयांपैकी एक आहे. जयकर ग्रंथालयात भारतीय व विदेशी मासिके घेतली जातात तसेच ग्रंथालयात काही नियतकालिके मोफत मिळतात. जयकर ग्रंथालयात ५ लाखांहून अधिक पुस्तके व विविध विषयांवरील मासिके आहेत. अशा सुविधांमुळेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातीलच नव्हे तर देशातील विद्यार्थ्यांच्या पहिल्या पसंतीचे विद्यापीठ आहे. पुणे विद्यापीठ ज्ञानाची निर्मिती, संरक्षण आणि प्रसारण करणारे जागतिक दर्जाचे विद्यापीठ आहे.

**- श्याम ठाणेदार**

# दृष्ट काढणे - एक प्राचीन परंपरा !

कलर्स मराठी वाहिनीवर सद्या सुरु असलेल्या 'बिग बॉस' मराठी या कार्यक्रमातील एका प्रसंगावर आक्षेप घेत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने कलर्स मराठी वाहिनीला आणि निवेदकांना निवेदन दिले आहे. ४ फेब्रुवारी या दिवशी कार्यक्रमाचा २५ वा भाग प्रसारित झाला. या भागात कलाकारांची दृष्ट काढतानाचा प्रसंग दाखवण्यात आला आहे. 'दृष्ट काढणे' ही अतिशय गंभीर बाब असून असे प्रसंग पडद्यावर दाखवून बिग बॉस मराठीकडून अंधश्रद्धा पसरवली जात असल्याचे आरोप अनिस कडून निवेदनात करण्यात आले आहेत. कार्यक्रमाचे निवेदक रितेश देशमुख यांनी हे निवेदन पुढील भागात वाचून दाखवावे जेणेकरून प्रेक्षकांच्या मनात अंधश्रद्धा बळावण्याची धोका टळेल अशी मागणी अंनिसने यासंदर्भात केली आहे.

दृष्ट काढणे किंवा नजर काढणे या प्रथेचा उल्लेख ऋग्वेद आणि अथर्ववेदात आढळतो. वाईट नजरेपासून संरक्षण होण्यासाठी अथर्ववेदात मंत्र आणि औषधी सांगितल्या गेल्या आहेत. रामायण महाभारत काळातही लहान मुलांना दृष्ट लागू नये म्हणून संरक्षणात्मक उपाय केल्याचे संदर्भ आढळतात. युद्धासाठी जाणाऱ्या योध्यांनाही त्याकाळी दृष्ट शक्तींपासून संरक्षणासाठी ताईत अथवा मंत्र दिले गेल्याचा उल्लेख प्राचीन ग्रंथांत सापडतो. बाळ श्रीकृष्णाला दृष्ट लागू नये म्हणून माता यशोदेने विविध उपाय केल्याचे उल्लेख श्रीकृष्णलीलेत आढळते . बाळाला काजळ आणि तिठा लावणे, हातात काळे मणी बांधणे या प्रथासुद्धा पूर्वापार चालत आल्या आहेत. राजपुत्र-राजकन्या यांचे वाईट नजरेपासून रक्षण व्हावे यासाठी विधिवत रक्षणसुत्र बांधल्याचे, विविध पूजाविधी केल्याचे संदर्भ प्राचीन ग्रंथांत आढळतात. भारत हा कृषिप्रधान देश असल्याने शेतात पीक बहरल्यावर त्याला दृष्ट लागू नये म्हणून काळा बाहुला अथवा लिंबू मिरची बांधण्याची प्रथाही परंपरागत चालत आली आहे. हल्ली वाहनांनाही दर शनिवारी लिंबू मिरची आणि बिब्बा बांधला जातो. लहान मूल घरी आल्यावर, नववर-वधू गृहप्रवेश करताना, नवीन गाडी किंवा वस्तू घेतल्यावर दृष्ट काढली जाते. वाईट नजरेपासून रक्षण व्हावे यासाठी दृष्ट काढणे ही भारतीय संस्कृतीतील प्रथा परंपरेचाच एक भाग असून तो पूर्वापार चालत आला आहे; मात्र हिंदू धर्मातील प्रथा परंपरांना अंनिसने आजतागायत अंधश्रद्धेच्या चष्म्यातूनच पाहिले आहे त्यामुळे जे देवादिकांना मान्य आहे ते अंनिसला मात्र मान्य नाही.



ग्रीसमध्ये 'इव्हील आय' ही फार जुनी संकल्पना आहे. इ.पूर्व सहाव्या शतकात होऊन गेलेल्या ग्रीक तत्वज्ञानी प्लुटार्क त्यांच्या लिखाणात नजर लागते असा उल्लेख केलेला आढळतो. अरब संस्कृतीमध्ये 'अल ऐन' ही दृष्ट काढण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. इसवीसन पूर्व ३००० मध्ये सुमेरियन आणि अक्केडियन संस्कृतींमध्ये नजर लागण्याचा उल्लेख सापडतो. इजिप्त संस्कृतीमध्ये 'आय ऑफ होरस' त्याकाळी वाईट नजरेपासून बचावाचे कार्य करत असल्याचा उल्लेख आढळतो. ग्रीक संस्कृतीत प्लेटो, अरिस्टॉटल यांना वाटत असे की डोळ्यांतून ऊर्जा बाहेर पडत असते. जास्त कौतुक करताना आणि एखाद्याचा मत्सर करताना ती बाहेर पडत असते. रोमन साम्राज्यातही पूर्वी गर्भवती स्त्रिया आणि लहान मुले यांना नजर लागू नये म्हणून ताईत बांधला जात असे. इस्लाममधील हदीसमध्ये दृष्ट लागण्याचा उल्लेख आढळतो. युरोपियन संस्कृतीतही जादूटोणा केल्याचा उल्लेख विविध ठिकाणी आढळतो आणि त्यासाठी विविध उपायही सांगण्यात आलेले आहेत. लॅटिन अमेरिकेत लहान मुलांना सारखा ताप येणे, मूल सतत रडत राहणे हे दृष्ट लागण्यामुळे होते असे वाटून त्याकरिता त्यांनी विविध उपायसुद्धा शोधून काढले आहेत. आफ्रिकेत पिकांना, घरांना दृष्ट लागते असा तेथील लोकांचा समज आहे आणि हे लोक त्यासाठी विविध उपाययोजना करत असतात. जगाच्या जवळपास प्रत्येक भागात दृष्ट लागण्याला मान्यता आहे. भारतभूमी आधुनिक विज्ञानाच्या शोधांची जननी आहे याबाबत कोणाचेच दुमत नसावे. भारतातील ऋषीमुनींनी कोणत्याही आधुनिक साधनाविना जे शोध हजारो वर्षांपूर्वी लावले, जे सिद्धांत मांडले, जी प्रमेय मांडली ती आज विज्ञानाच्या बळावर तंतोतंत खरी ठरत आहेत. दृष्ट लागण्याचा उल्लेख तर थेट वेदांमध्ये आढळतो. डोळ्यांतून नकारात्मक ऊर्जा बाहेर पडते हे सिद्ध करण्यात विज्ञान अपुरे पडले याचा अर्थ ती संकल्पना चुकीची आहे असे कसे म्हणता येईल. भारतीय संस्कृतीतील प्रथा परंपरा अंनिसला अंधश्रद्धा वाटत असतील तर जगातील अन्य प्राचीन संस्कृतीचाही अभ्यास करावा. सर्वच प्राचीन संस्कृतीत दृष्ट लागण्याचा उल्लेख आढळतो. दृष्ट लागली म्हणून केल्या जाणाऱ्या उपायांमुळे कोणालाही हानी होत नाही उलट ज्याची दृष्ट काढली जाते त्याला आराम मिळतो. २१ व्या शतकात ग्रामीण भागात जशी दृष्ट काढली जाते तशी शहरी भागातही काढली जाते'. विकासात उत्तुंग भरारी घेणाऱ्या भारताच्या खेड्यापाड्यापर्यंत आज वैद्यकीय सोयी सुविधा पोहोचल्या आहेत. त्यामुळे आज लहानसहान खेड्यातही रुग्णाची दृष्ट काढण्यासोबत त्याला वैद्यकीय उपचारही दिले जातात. त्यामुळे अंनिसने त्याविषयी अधिक काळजी करू नये !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

## शैली

निवडणूकीत हवी
समयानुरुप शैली
जसे असे समोरचे
वापरा भिन्न कैली

अपेक्षा ना अधिक
वाट असतेचं मैली
जसा असेलं गळा
तशी घालावीसैली

गूढचक्रव्यूह रचावे
फसे तलवार ढाली
बाजारआतून मिंधे
ठप्पहोई उलाढाली

ऐकेना जरसमोरचे
काढ जुन्याफाईली
लफडे तर असतेचं
ठरवायचे बद फैली

हव्यासलाळघोट्या
देऊनटाकावी थैली
तेजीत असे हवाला
अनेक मार्ग हल्ली

प्रत्येकसहयोग्याची
ठेव मास्टर किल्ली
जे फोडी डरकाळी
बनवा भिगीबिल्ली

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

# इतर राज्ये मंदिरे आणि पुतळे बांधण्यात व्यस्त असताना, केरळने ज्ञानाचं मंदिर उभारलं!






**- प्रविण बागडे**
**नागपूर**
**मो.९९२३६२०९१९**

देशाच्या विकासाची दिशा नेमकी कुठे चालली आहे, हा प्रश्न आज अधिक तीव्रतेने समोर उभा राहिला आहे. एकीकडे भव्य मंदिरे, उंचच उंच पुतळे, कोट्यवधींचे सौंदर्यीकरण प्रकल्प यांची जाहिरातबाजी सुरू असताना; दुसरीकडे केरळने शांतपणे, पण ठामपणे इतिहास घडवणारा निर्णय घेतला आहे. पदवीपर्यंत मोफत शिक्षण देणारे देशातील पहिले राज्य होण्याचा हा निर्णय केवळ आर्थिक नाही, तर वैचारिक क्रांतीचा आहे. हा निर्णय म्हणजे विकासाची खरी व्याख्या काय असते, यावर दिलेला सडेतोड उत्तर आहे. मंदिरं आणि पुतळे श्रद्धेचं प्रतीक असू शकतात; पण शिक्षण हे समाजाच्या भवितव्याचं बीज असतं. श्रद्धा आत्म्याला समाधान देते, पण शिक्षण माणसाला प्रश्न विचारायला शिकवतं. शिक्षण माणसाला देव शोधायला नाही, तर स्वतःमधील शक्ती ओळखायला भाग पाडतं. केरळने हाच मार्ग निवडला आहे, माणसात गुंतवणूक करण्याचा मार्ग.

आज देशात शिक्षण ही सेवा न राहता एक महागडी वस्तू बनली आहे. शाळा म्हणजे व्यवसाय, कॉलेज म्हणजे कॉर्पोरेट संस्था, आणि पदवी म्हणजे केवळ नोकरी मिळवण्याचं साधन अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. गरीब, कष्टकरी, शेतकरी, आदिवासी, दलित, अल्पसंख्याक यांच्यासाठी शिक्षण अजूनही स्वप्नच आहे. अशा वेळी केरळचा निर्णय म्हणजे या व्यवस्थेला दिलेला जोरदार चपराक आहे. केरळने हे पहिल्यांदाच केलं असं नाही. देशात सर्वाधिक साक्षरता दर, आरोग्य निर्देशांक, स्त्री-पुरुष समानता, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था या सगळ्यांमध्ये केरळ नेहमीच आघाडीवर राहिलं आहे. कारण इथे विकासाची संकल्पना रस्ते, पूल, पुतळे यापुरती मर्यादित नाही; इथे विकास म्हणजे माणूस केंद्रस्थानी आहे. मानव विकास ही संकल्पना इथे केवळ कागदावर नाही, तर धोरणात आणि कृतीत आहे.

आज इतर अनेक राज्यांमध्ये हजारो कोटी रुपये पुतळ्यांवर खर्च होत आहेत. त्या पुतळ्यांची उंची जितकी वाढते, तितकी सामान्य माणसाच्या प्रश्नांची खोली वाढत जाते. बेरोजगारी, कुपोषण, शाळाबाह्य मुलं, गळती (ड्रॉपआउट), शिक्षणातील असमानता, हे प्रश्न मात्र तसेच राहतात. कारण प्राधान्यक्रम चुकलेला आहे. केरळने तो प्राधान्यक्रम बरोबर ओळखला आहे. पदवीपर्यंत मोफत शिक्षण म्हणजे केवळ फी माफ करणे नाही; तो सामाजिक न्यायाचा निर्णय आहे. हा निर्णय सांगतो की शिक्षण ही कोणाची मक्तेदारी नाही. तो सांगतो की गरीबाचा मुलगाही डॉक्टर, अभियंता, संशोधक, प्रशासक होऊ शकतो. तो सांगतो की मुलींचं शिक्षण खर्चामुळे अर्धवट थांबणार नाही. हा निर्णय म्हणजे पिढ्यांच्या दारिद्र्याच्या साखळ्या तोडण्याचा प्रयत्न आहे.

आज देशात राष्ट्र उभारणीच्या नावाखाली भावनिक घोषणा दिल्या जातात. पण राष्ट्र उभं राहतं ते सुशिक्षित नागरिकांवर. प्रश्न विचारणाऱ्या, विवेकी, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या नागरिकांवर. केरळचा निर्णय हा अंधश्रद्धा, जातीयता, धार्मिक ध्रुवीकरण यांना दिलेला मौनातला प्रतिकार आहे. कारण शिक्षण माणसाला अंध बनवत नाही, तर डोळे उघडायला शिकवतं. हा निर्णय राजकीय धाडसाचाही आहे. कारण शिक्षणावर खर्च करणं म्हणजे लगेच दिसणारा फायदा नसतो. पुतळा उभा केला की तो लगेच दिसतो, फोटो काढता येतो, उद्घाटन करता येतं. पण शिक्षणाचं फळ पिढ्यांनंतर दिसतं. ते मथळ्यांत येत नाही, पण इतिहासात नोंदवलं जातं. केरळने लोकप्रियतेपेक्षा भविष्य निवडलं आहे.

आज खासगी शिक्षण संस्थांच्या विळख्यात अडकलेला मध्यमवर्ग आणि गरीब वर्ग कर्जाच्या ओझ्याखाली दबला आहे. शिक्षणासाठी कर्ज, नोकरीसाठी संघर्ष, आणि आयुष्यभर त्याची परतफेड, हा दुष्टचक्र बनलं आहे. केरळचा निर्णय या चक्राला तोडण्याचा प्रयत्न आहे. शिक्षण मोफत असेल, तर तरुण अधिक निर्भय होतील, नवकल्पनांकडे वळतील, संशोधन, कला, समाजसेवा यांसारख्या क्षेत्रांकडे पाहू शकतील. काही जण विचारतील, हे आर्थिकदृष्ट्या परवडेल का? पण खरा प्रश्न असा आहे की पुतळे परवडतात, पण शिक्षण नाही का? जाहिराती परवडतात, पण ग्रंथालयं नाही का? उत्सव परवडतात, पण विद्यापीठं नाही का? हा प्रश्न केवळ पैशाचा नाही, तर इच्छाशक्तीचा आहे. केरळने ती इच्छाशक्ती दाखवली आहे.

केरळचा हा निर्णय देशाला आरसा दाखवतो. तो विचारायला भाग पाडतो, आपण देव उंच करतोय, पण माणूस का खुंटतोय? आपण इतिहासाचं स्मारक उभं करतोय, पण भविष्य का दुर्लक्षित आहे? हा संपादकीय केवळ केरळचं कौतुक करण्यासाठी नाही; तर इतर राज्यांना जागं करण्यासाठी आहे. आज गरज आहे ती शिक्षणाला राजकीय अजेंड्याच्या केंद्रस्थानी आणण्याची. शिक्षण म्हणजे खर्च नाही, ती गुंतवणूक आहे. सर्वात सुरक्षित, सर्वात दूरगामी आणि सर्वात मानवी गुंतवणूक. केरळने ते ओळखलं आहे. आता प्रश्न असा आहे की, देश उरलेल्या राज्यांनी केव्हा ओळखणार ? इतिहास साक्ष देतो, ज्या समाजाने शस्त्रांपेक्षा शाळा उभारल्या, त्या समाजाने जग बदललं. ज्या समाजाने पुतळ्यांपेक्षा पुस्तकांना महत्त्व दिलं, त्या समाजाने विचारांची सत्ता मिळवली. केरळने ज्ञानाचं मंदिर उभारलं आहे. आता देशाला ठरवायचं आहे. आपण श्रद्धेच्या सावलीत राहायचं की विवेकाच्या प्रकाशात पुढे जायचं? कारण शेवटी एकच सत्य उरतं, पुतळे उंच असू शकतात, पण शिक्षणाशिवाय माणूस उभाच राहू शकत नाही.

## ज्वलनशील प्रोपलेन गॅस टँकर कलंडला, आपत्ती व्यवस्थापन कमी पडले?

मुंबई - पुणे एक्स्प्रेस हायवेवर ( यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग ) अडीच - तीन तासांत मुंबई - पुण्यात अति जलद गतीने पोहचण्याचा मार्ग आहे.या मार्गावरुन प्रवास करताना प्रत्येक प्रवाशाला वाटते आपण तीन तासांत पोहोचणार आहे त्यामुळे सोबत खाण्यापिण्याची व्यवस्था करण्याची आवश्यकता ग्रहीत धरली जात नाही.मंगळवारी, सायंकाळी सहाच्या सुमारास आडोशी बोगद्या जवळ प्रोपलेन गॅस वाहून नेणारा टँकर पलटी झाल्याने या महामार्गावर न भूतो अशी तब्बल २४ तास प्रचंड कोंडी झाली.वायु गळतीच्या भितीने दोन्ही बाजू कडील वाहतूक बंद करण्यात आल्याने अन्न - पाण्याविना प्रवाशांचे हाल झाले. त्यात लहान मुले, जेष्ठ नागरिक,रुग्ण यांना नाहक त्रास सोसावा लागला.घडलेल्या दुर्घटनेनंतर राज्य रस्ते विकास महामंडळाचे आपत्कालीन व्यवस्थापन मदतीला धावून आले नाही.२४ तास प्रवासी अडकून पडले त्यांना प्राथमिक मदत उपलब्ध झाली नाही. एवढ्या तासांत कलंडलेला टँकर मार्गातून हटवण्यात यंत्रणांना यश आले नाही.या कालावधीत वाहन चालक,प्रवाशांना ना कोणी सुचेना दिल्या ना कोणती मदत मिळाली.पथकर वसुल करणार्या आय आर बी कंपनी वर आणि राज्य रस्ते विकास महामंडळावर प्रवाशांचा प्रचंड रोष आहे.तब्बल ३० किलोमीटरच्या रांगा लागल्या.वाहतूकीचा खेळ खंडोबा झाला.गॅस गळती रोखण्यात एन डी आर एफला अपयश,बी पी सी पी एल ,एच पी सी एल, रिलायन्स कंपनीच्या तज्ज्ञांना यश.कोंडीत अडकलेल्या लोकांना नैसर्गिक विधीची भयानक गैरसोय,एस टी बस जागेवरच थांबल्याने प्रवाशांची ससे होलपट झाली होती.नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या मदत होणार नसेल तर आपत्कालीन व्यवस्थापनचा उपयोग काय ? शहर, ग्रामीण भागातील पोलिस महिला व पुरुष कर्मचारी पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून पाणी बाटल्या प्रवाशांना मोफत देत असतानाचे सोशल मीडिया वर व्हिडिओ मोबाईल वर झळत होते.सरकारने ही घटना गांभीर्याने घ्यायला हवी.

**- महादेव गोळवसकर, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## वडगाव सावताळ येथे ६३ केव्ही ट्रान्सफॉर्मरचे भूमिपूजन



## सुजित झावरे पाटील यांच्या प्रयत्नातून ट्रान्सफॉर्मर मंजूर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील वडगाव सावताळ येथील वीज पुरवठा सुधारणा आणि ग्रामीण भागातील वीज समस्या कमी करण्यासाठी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने मंजूर झालेल्या ६३ केव्ही क्षमतेच्या नवीन ट्रान्सफॉर्मरचे भूमिपूजन कार्यक्रम पार पडला. भूमिपूजन सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी पो. मा. झावरे, दिलीप पाटोळे, बाळासाहेब झावरे, बाळासाहेब शिंदे, प्रसाद झावरे, राजेंद्र रोकडे, गो. या. रोकडे, कर्ण रोकडे, चेअरमन शिवाजी रोकडे, योगेश रोकडे, मिठू शिंदे सर, बाबासाहेब लोखंडचूर, संदीप खंडाळे, संदीप व्यवहारे, गणेश खंडाळे, सुभाष खंडाळे, दिनकर खंडाळे, बंडू गायकवाड, सतीश गायकवाड, प्रमोद गायकवाड, दत्ता व्यवहारे, खंडू कोळेकर, बाळू साहेब वरखडे, राजू केदार, किसन खरमाळे, किरण रांधवण, वैभव रोकडे, गणेश खरमाळे यांच्यासह गावातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना सुजित झावरे पाटील म्हणाले, वडगाव सावताळ आणि परिसरातील शेतकरी बांधवांना वर्षानुवर्षे वीज खंडित होण्याचा, कमी व्होल्टेजचा त्रास सहन करावा लागत होता. या समस्येवर मात करण्यासाठी मी महावितरण विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. आज या ६३ केव्ही ट्रान्सफॉर्मरमुळे गावाला अधिक स्थिर आणि दर्जेदार वीज पुरवठा मिळेल. यामुळे शेतीसाठी पाणीउपसा, घरगुती वापर आणि लहान उद्योगांना मोठा दिलासा मिळेल. ही केवळ वीज योजना नाही, तर गावाच्या प्रगतीची आणि शेतकऱ्यांच्या कष्टाला न्याय मिळवून देण्याची सुरुवात आहे. पुढील काळातही अशा विकासकामांसाठी मी पूर्ण ताकद लावेन. उपस्थित मान्यवरांनीही सुजित झावरे पाटील यांच्या विकासकामांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

## शृंगारतळी नव्या पर्वाकडे; मनसेचे प्रमोद गांधी यांचा दणदणीत विजय



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०९, गुहागर (ठाणे) :** विधानसभा निवडणुकीत अपयशाला सामोरे जात शृंगारतळी जिल्हा परिषद गटातून दुसऱ्यांदा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले प्रमोद गांधी यांनी नुकत्याच पार पडलेल्या जि.प. निवडणुकीत विजयश्री खेचून आणताना ६१५८ प्रभावी कामगिरी करत विजय मिळवला. शिवशक्ती युतीतून मनसेचे उमेदवार म्हणून गांधी यांनी शिवसेना - शिंदे गट, भाजपा महायुतीला मोठा धक्का दिला असून भाजपचे उमेदवार डॉ.राजेंद्र विष्णु पवार यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला असून जनशक्तीच्या जोरावर याठिकाणी धनशक्तीला मोठी चपराक दिली आहे.

गांधी यांनी मिळवलेल्या या दणदणीत यशामुळे शृंगारतळी गटाच्या राजकीय पटलावर मोठा बदल झाल्याचे चित्र आहे. गांधी यांच्या विजयाने कार्यकर्ते आणि मनसे समर्थकांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला असून तालुक्यामध्ये मोठा जल्लोष साजरा केला जात आहे.

विजय घोषित झाल्यानंतर गांधी यांनी मतदार जनतेचे आभार मानले. निवडणूक काळात दिलेले प्रत्येक आश्वासन सर्वांना सोबत घेऊन, गाव -वाडी वस्तीवर जनतेशी संवाद साधून याठिकाणी शाश्वत विकासावर भर देणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. गांधी यांच्या रूपाने शृंगारतळी गटात सामाजिक बांधिलकी जपणारा नेतृत्व मिळाल्याने येथील जनतेच्या अपेक्षा अधिक उंचावल्या आहेत.

## ऑपरेशन मुस्कान अंतर्गत १०५ अल्पवयीन मुलींची सुटका; पोलिसांना शुभेच्छा




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०९, राहुरी (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर जिल्ह्याच्या पाहणी दौऱ्या दरम्यानअपर पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश (फोर्स वन व प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई) यांनी राहुरी पोलीस स्टेशनच्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक करत संपूर्ण टीमला शुभेच्छा दिल्या. दि.०९ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या इन्स्पेक्शन दरम्यान अपर पोलीस महासंचालक श्री. कृष्ण प्रकाश तसेच पोलीस अधीक्षक सोम नाथ घार्गे यांनी राहुरी पोलीस स्टेशनच्या 'ऑपरेशन मुस्कान' अंतर्गत करण्यात आलेल्या कामगिरीचा आढावा घेतला. या मोहिमेत अपहरण झालेल्या १०५ अल्पवयीन मुलींचा शोध घेऊन त्यांची सुरक्षित सुटका करण्यात आली असून संबंधित आरोपींना अटक करून मुदतीत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. या प्रभावी कामगिरीबद्दल राहुरी पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांचे विशेष कौतुक करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे बेलवंडी पोलीस स्टेशन येथे कार्यरत असताना बेलवंडी परिसरात विविध राज्यांतील रेल्वे स्थानकांवरून अपहरण करून आणलेल्या व वेठबिगारीत अमानुष जीवन जगण्यास भाग पाडलेल्या २३ वेठबिगारांची मुक्तता करण्यात आलेल्या कारवाईचाही उल्लेख करण्यात आला. या धाडसी व मानवतावादी कार्याबद्दल पोलीस निरीक्षक संजय ठेंगे व बेलवंडी पोलीस स्टेशनच्या तत्कालीन टीमचा गौरव करत त्यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.राहुरी पोलीस स्टेशनने केलेल्या या कामगिरीमुळे नागरिकांमध्ये पोलिसांबद्दल विश्वास अधिक दृढ झाला असून भविष्यात ही अशाच प्रकारे प्रभावी कारवाई सुरू ठेवण्याच्या सूचना यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिल्या.

# टाकळी ढोकेश्वर यात्रा उत्सव कमिटीच्या पदांची नियुक्ती

### अध्यक्षपदी संपत तराळ तर उपाध्यक्षपदी संजय खिलारी





**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर पंचक्रोशीतील सर्व धर्मियांचे श्रद्धास्थान असलेले जागृत देवस्थान ग्रामदैवत माता बनाई देवी यात्रा उत्सव कमिटीची बैठक गावच्या वेशी समोरील पारावरती नुकतीच ग्रामस्थांच्या उपस्थितीत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावर्षीच्या यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी संपतराव तराळ यांची तर उपाध्यक्षपदी संजय खिलारी (मेजर), खजिनदारपदी संजय झावरे, सचिवपदी पत्रकार वसंत रांधवण यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

टाकळी ढोकेश्वर येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बनाई देवी यात्रा गुढीपाडव्याच्या तिसऱ्या दिवशी दि.२१ ते २४ एप्रिल या कालावधीत होणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक, धार्मिक उपक्रमांसाठी नियोजन बैठकीमध्ये आगामी यात्रेचे नियोजन यशस्वी करण्यासाठी नवीन यात्रा कमिटीची कार्यकारिणी सज्ज झाली आहे.

**बनाई देवी यात्रा उत्सव कमिटी नुतन कार्यकारणी ती पुढीलप्रमाणे:** अध्यक्ष संपतराव तराळ, उपाध्यक्ष संजय खिलारी (मेजर), खजिनदार संजय झावरे, सचिव पत्रकार वसंत रांधवण तर सल्लागार म्हणून बाळासाहेब खिलारी, अशोकशेठ कटारिया, युवा उद्योजक राजूशेठ भंडारी, तर प्रसिद्धी प्रमुखपदी पत्रकार वसंत रांधवण, हगामा कमिटीचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, बैलगाडा शर्यतीचे अध्यक्ष बाळकृष्ण पायमोडे, सदस्य पदी अंकुश पायमोडे, संतोष बांडे, किसन धुमाळ, सागर तराळ, शरद झावरे, माजी सरपंच शिवाजी खिलारी, बाजार समितीचे संचालक अशोकशेठ कटारिया, माजी उपसभापती विलास झावरे, धोंडिभाऊ झावरे, उपसरपंच रामभाऊ तराळ,बापूसाहेब रांधवण, विक्रम झावरे, गणेश चव्हाण, दिगंबर शेळके, विकास आल्हाट,मळिभाऊ रांधवण,सिराज हवालदार व इतर यांचा समावेश आहे.

ही निवड झाल्यानंतर ग्रामस्थ आणि भाविकांकडून कमिटीचे अभिनंदन केले जात असून, यात्रेच्या कामाला आता अधिक वेग येणार असल्याचे सांगण्यात आले. याप्रसंगी यात्रा कमिटीचे मार्गदर्शक निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सरपंच बाळासाहेब खिलारी यांनी होणाऱ्या यात्रेची रूपरेषा सांगितली. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कमिटीकडून यंदाच्या चार दिवसीय होणाऱ्या यात्रेत विशेष विविध सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक मनोरंजनाचे, कुस्त्यांचा आखाडा, बैलगाडा शर्यतींचा उपक्रम व सुविधा पुरवण्यावर भर दिला जाणार आहे.

# आ.दातेंच्या अध्यक्षतेखाली क्षेत्र स्तरीय समितीची बैठक संपन्न



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली क्षेत्रस्तरीय समितीची महत्त्वपूर्ण बैठक पारनेर येथील तहसील कार्यालयात संपन्न झाली. शेतकऱ्यांच्या दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणि शेत रस्त्याच्या कामांना गती देण्यासाठी ही बैठक निर्णायक ठरणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

आमदार काशिनाथ दाते यांच्या सूचनेनुसार सोमवार, दिनांक ०९ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस प्रांताधिकारी श्रीकुमार चिंचकर, तहसीलदार गायत्री सौंदाने यांचेसह पोलिस निरीक्षक नितीन खंडागळे, कृषी अधिकारी गजानन घुले, उप अभियंता सुबोध वसईकर, किरण जाधव , भुमी अभिलेख पाटील व संबंधित विभागांचे अधिकारी व क्षेत्रस्तरीय समितीचे मान्यवर सदस्य उपस्थित होते. या बैठकीत मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेअंतर्गत प्रस्तावित व प्रलंबित रस्त्यांचा आढावा घेण्यात आला.

शेतकऱ्यांना वर्षभर सुरक्षित व सुलभ दळणवळण मिळावे, शेतीमाल वाहतुकीस अडथळे येऊ नयेत, तसेच रस्त्यांची कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण व्हावीत, याबाबत आमदार काशिनाथ दाते यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या. शेतकरी केंद्रस्थानी ठेवून विकासकामे राबविणे हा आपला प्राधान्यक्रम असून, बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना ही केवळ रस्ता बांधकामापुरती मर्यादित नसून ती शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीशी जोडलेली असल्याचे आमदार दाते यांनी यावेळी नमूद केले. कामांमध्ये कोणतीही दिरंगाई होऊ नये व योजनेचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा, यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे, असे निर्देश ही त्यांनी दिले.

मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेअंतर्गत प्रस्तावित व प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा या बैठकीत घेण्यात आला. समिती अध्यक्ष आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिलेल्या सूचनांनुसार संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून रस्त्यांची कामे वेळेत व दर्जेदार पूर्ण करण्यावर भर दिला जाईल.

**- श्रीकुमार चिंचकर (प्रांताधिकारी, पारनेर - श्रीगोंदा)**

शेतकऱ्यांच्या दळणवळणाचा प्रश्न सोडविण्यासाठी बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना अत्यंत महत्त्वाची आहे. आमदार काशिनाथ दाते सर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाकडून आवश्यक ती कार्यवाही करून योजनेचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात येईल.

**- गायत्री सौंदाने (तहसीलदार, पारनेर)**

# हत्तीरोग दुरीकरणासाठी भिवंडी तालुक्यात आजपासून सार्वत्रिक औषधोपचार मोहीम



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०९, भिवंडी (ठाणे) :** हत्तीरोग दुरीकरणासाठी महाराष्ट्र राज्य शासन वचनबद्ध असून त्या अनुषंगाने राज्यातील ६ जिल्ह्यांतील १६ तालुक्यांमध्ये दि.१० ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सार्वत्रिक औषधोपचार मोहीम (एम. डी.ए.) राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने भिवंडी तालुक्यात जनजागृतीसाठी मोबाईल आरोग्य जनजागृती व्हॅनचा वापर करण्यात येत आहे.

या व्हॅनचे उद्घाटन व हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते करण्यात आला. ही मोहीम जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, ठाणे व त्रेव्नअॅशक्ष एालशव – त्रक्रख संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. संतोषी शिंदे, जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. स्वाती शिंदे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. बालाजी गावडे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी संजय जाधव, जनसंपर्क अधिकारी रेश्मा आरोटे व अन्य कर्मचारी उपस्थित होते.या मोहिमेंतर्गत आरोग्य कर्मचारी घरोघरी भेट देऊन नागरिकांना हत्तीरोग विरोधी गोळ्या खाऊ घालणार आहेत.

ठाणे जिल्ह्यात भिवंडी तालुक्यामध्ये ही मोहीम जिल्हाधिकारी ठाणे डॉ. श्रीकृष्ण पांचाळ व मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून तांत्रिक नियोजन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे व जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. संतोषी शिंदे यांच्या अधिपत्याखाली करण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत एकूण ७ लाख १२ हजार ४९ पात्र लाभार्थ्यांना हत्तीरोगविरोधी औषधे देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या मोहिमेमध्ये सहभागी होऊन आरोग्य विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. संतोषी शिंदे यांनी केले आहे.

ठाणे जिल्ह्यात भिवंडी तालुक्यात हत्तीरोगाचा प्रादुर्भाव अधिक असल्याने ही मोहीम प्रामुख्याने भिवंडी तालुक्यात राबविण्यात येत आहे. तालुक्यातील एकूण पात्र लोकसंख्या ५ लाख ८ हजार ७६५ इतकी असून स्थलांतरित पात्र लोकसंख्या २ लाख ३ हजार २८४ इतकी आहे. यामध्ये वीटभट्ट्या, गोदामे, नवीन बांधकामे, कारखाने आदी ठिकाणी कार्यरत व्यक्तींचा समावेश आहे. अशा पद्धतीने एकत्रित ७ लाख १२ हजार ४९ नागरिकांना औषधे देण्यात येणार आहेत.

हत्तीरोग हा सार्वजनिक आरोग्यासमोरील गंभीर प्रश्न असून संक्रमित डास चावल्यामुळे पसरणारा व दीर्घकालीन अपंगत्व निर्माण करणाऱ्या प्रमुख आजारांपैकी एक आहे. बहुतांश वेळा बालवयात संसर्ग होतो, मात्र त्याची लक्षणे प्रौढावस्थेत दिसून येतात. या आजारामुळे शरीरातील रोगप्रतिकारक शक्तीचा महत्त्वाचा भाग असलेल्या लसिका संस्थेचे नुकसान होते व वेळीच प्रतिबंध न केल्यास शरीराच्या विविध भागांमध्ये असामान्य सूज निर्माण होऊ शकते. या आजारावर कायमस्वरूपी उपचार उपलब्ध नसून प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपाय आहे.

मोहिमेदरम्यान भिवंडी तालुक्यात डीईसी व अल्बेंडाझोल या दोन औषधांची एकत्रित मात्रा दिली जाणार असून औषधे आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी जाऊन दिली जातील. यासाठी ५३१ पथके तयार करण्यात आली आहेत. दोन वर्षांखालील मुले, गर्भवती महिला व गंभीर आजार असलेल्या व्यक्तींना औषधे देण्यात येणार नाहीत. औषधे उपाशीपोटी घेऊ नयेत तसेच आशा सेविका किंवा आरोग्य कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीतच सेवन करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

ही औषधे आतड्यातील जंतुसंसर्ग व त्वचारोगांवरही प्रभावी असून मुलांच्या शारीरिक व बौद्धिक विकासास सहाय्यभूत ठरतात.

# उपमुख्यमंत्री शिंदेंचा वाढदिवस पारनेरमध्ये सामाजिक उपक्रमांनी साजरा

## सुजित झावरे पाटील यांच्या माध्यमातून शाळांमध्ये प्रिंटर व टिफिन बॅग वाटप



उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे हे महाराष्ट्राच्या विकासाचे आणि जनकल्याणाचे प्रतीक आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त पारनेर तालुक्यातील शाळांमध्ये प्रिंटर, टिफिन बॅग यांसारखे उपयुक्त साहित्य वाटप करून आम्ही त्यांच्या लोकाभिमुख विचारसरणीला जपत आहोत. सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण व बालकल्याणासाठी सातत्याने कार्यरत राहू. शिंदे साहेबांच्या मार्गदर्शनाने पारनेरचा विकास अधिक गतिमान होईल.

**– शिवसेना नेते सुजित झावरे पाटील**
**(माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद अहिल्यानगर)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांचा वाढदिवस पारनेर तालुक्यात सामाजिक बांधिलकी आणि जनकल्याणाच्या भावनेने साजरा करण्यात आला. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली विविध शाळांमध्ये उपयुक्त सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

डिकसळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी देवकृपा फाउंडेशनच्या माध्यमातून प्रिंटरचे वाटप करण्यात आले. यामुळे शाळेतील प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ होणार असून डिजिटल शिक्षणाला चालना मिळेल.

या कार्यक्रमाला सरपंच भाऊसाहेब चौधरी, सरपंच शरद काकडे, शिक्षिका ज्योती आंबे, शेळके, संदीप कपाळे, स्वप्निल राहिंज, भगवानराव शिंदे, मच्छिंद्र शिंदे, स्वप्निल काकडे, अजित काकडे यांच्यासह ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच वडगाव सावताळ येथील मेहेरबाबा माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी टिफिन बॅगचे वाटप करण्यात आले.

यामुळे मुलांना शाळेत नियमित येण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन शिवाजी रोकडे, खजिनदार राजेंद्र रोकडे, संदीप व्यवहारे, गणेश खंडाळे, विकास शिंदे, मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

सुजित झावरे पाटील यांनी एकनाथ शिंदे यांच्या विकासाच्या आणि लोककल्याणाच्या विचारसरणीला अनुसरून पारनेर तालुक्यातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात सातत्याने काम करत असल्याचे दिसून येते. या उपक्रमामुळे स्थानिक नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, शिंदे यांच्या नेतृत्वाचे कौतुक होत आहे.

# महाबळेश्वर मध्ये शिवसेना राष्ट्रवादी फिफ्टी फिफ्टी



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०९, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या २०२६ च्या सार्वत्रिक निवडणुकांचे निकाल आज जाहीर झाले असून तळदेव गट, कुंभरोशी गण तळदेव गणामध्ये शिवसेना उमेदवार तसेच भिलार गट, मेटगुताड गण व भिलार गणा मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले एकूणच मतदारांनी विभागून, पण ठाम कौल दिल्याचे चित्र समोर आले आहे.

**भिलार गटात राष्ट्रवादीचा एकतर्फी विजय**

भिलार गट आणि गणात राष्ट्रवादी काँग्रेसने आपले वर्चस्व कायम राखत विरोधकांवर निर्णायक मात केली आहे. जिल्हा परिषद भिलार गटात राष्ट्रवादीचे उमेदवार संजय केळगणे यांनी तब्बल ८,७८८ मते मिळवत दणदणीत विजय मिळवला.

त्यांनी भाजपच्या रंजना कदम (२,३५३ मते) यांचा ६,०९३ मतांच्या फरकाने पराभव केला. या लढतीत संदीप चपटे यांना १,१७५ मते मिळाली.

पंचायत समिती भिलार गणातही राष्ट्रवादीची सरशी राहिली. वंदना प्रवीण भिलारे यांनी ५,१३६ मते मिळवत भाजपच्या सुप्रिया भिलारे (९९२ मते) यांचा ४,१४४ मतांनी पराभव केला. मेटगुताड गणात राष्ट्रवादीने आपले अस्तित्व कायम ठेवले.

शकुंतला चोरमले यांनी २,७८४ मते मिळवत भाजपच्या अमिना शारवान (१,६९८ मते) यांचा १,०८६ मतांनी पराभव केला. राष्ट्रवादीचा बालेकिल्ला अजून मजबूत झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

**तळदेव गटात शिवसेनेची दमदार कामगिरी**

तळदेव गटात मात्र चित्र पूर्णपणे वेगळे पाहायला मिळाले. येथे राष्ट्रवादीला मोठा धक्का देत शिवसेनेने सत्ता हस्तगत केली आहे.

जिल्हा परिषद तळदेव गटात शिवसेनेचे अजित सकंपाळ यांनी ७,६७३ मते मिळवत राष्ट्रवादीचे माजी सभापती संजय गायकवाड (४,६७३ मते) यांचा ३,००० मतांनी पराभव केला. या लढतीत भाजपचे सुभाष सोंडकर यांना ५५७ मते मिळाली.

पंचायत समिती तळदेव गणातही शिवसेनेचे वर्चस्व राहिले. संजय शेलार यांनी ४,२८२ मते मिळवत राष्ट्रवादीच्या संजय उतेकर (२,२७२ मते) यांचा २,०१० मतांनी पराभव केला. तळदेवमध्ये शिवसेनेची संघटनात्मक ताकद पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. कुंभरोशी गणात अत्यंत चुरशीच्या लढतीत शिवसेनेचे संजय मोरे यांनी २,७७२ मते मिळवत सचिन उतेकर (२,४३८ मते) यांचा केवळ ३३४ मतांनी पराभव केला. ही लढत शेवटपर्यंत रंगतदार ठरली.

भिलार गट (जि.प.) – संजय केळगणे (राष्ट्रवादी) । मताधिक्य: ६,०९३

तळदेव गट (जि.प.) – अजित संकपाळ (शिवसेना) । मताधिक्य: ३,०००

भिलार गण (पं.स.) – वंदना भिलारे (राष्ट्रवादी) । मताधिक्य: ४,१४४

तळदेव गण (पं.स.) – संजय शेलार (शिवसेना) । मताधिक्य: २,०१०

कुंभरोशी गण (पं.स.) – संजय मोरे (शिवसेना) । मताधिक्य: ३३४

मेटगुताड गण (पं.स.) – शकुंतला चोरमले (राष्ट्रवादी) । मताधिक्य: १,०८६

# जिल्हा परिषद गटात ५ पैकी ४ जागा तर पंचायत समिती गणात १० पैकी ८ जागांवर भाजपचे उमेदवार विजयी

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०९, पेण (रायगड) :** जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक निकाल आज जाहीर झाला असून पाच पैकी चार जागा जिंकत भाजपने आपले वर्चस्व राखले आहे. मात्र शिहू गटात शिवसेना उबाठा पक्षाने भाजपचा पराभव करीत आपली राजकीय ताकद दाखवली आहे.

पंचायत समिती गणात भाजपने १० पैकी ८ जागा जिंकत सत्ता कायम राखण्यात यश मिळवले आहे. मात्र शिहू जिल्हा परिषद गट आणि गणातील ३जागा शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाददादा भोईर यांनी भाजपला धोबीपछाड देत पत्नी पल्लवी भोईर चुलते संजय भोईर आणि प्रिती पाटील यांना विजयी केले. हे पेण तालुक्यातील निवडणूक विजयाचे विशेष लक्षणीय बाब ठरली.

१. जिते जिल्हा परिषद गटात ताई जोमा दरवडा यांनी १३७८४ तर भाजपा विजयी तर पंचायत समिती



गणात भाजपचे कमल पवार आणि संजय डंगर विजयी झाले आहेत.

२. दादर जिल्हा परिषद गटात वैकुंठ रवींद्र पाटील भाजप विजयी तर पंचायत समिती गणात भाजपच्या स्मिता प्रमोद पाटील आणि अस्मिता प्रल्हाद पाटील विजयी झाले.

३. महलमिऱ्या डोंगर जिल्हा परिषद गटात भाजपचे जनार्दन बुध्या भस्मा विजयी आणि पंचायत समिती गणात भाजपचे सुशांत खाकर मेघा मच्छिंद्र पाटील विजयी झालेत.

४. वडखळ जिल्हा परिषद गणात भाजपचे प्रभाकर वासुदेव म्हात्रे (हरी ओम) विजयी आणि पंचायत समिती गणात भाजपचे विवेक सदानंद म्हात्रे आणि प्रदीप मधुकर म्हात्रे विजयी झालेत.

५. शिहू जिल्हा परिषद गटात शिवसेना उबाठा पक्षाच्या पल्लवी प्रसाद भोईर यांनी भाजपच् शर्मिला वैकुंठ पाटील याचा पराभव करून दमदार विजयी मिळवला आहे. डोलवी गणात शिवसेनेच्या प्रीती प्रशांत पाटील आणि शिहू गणात संजय भोईर शिवसेना उबाठाचे विजयी झाले आहेत. या तीन ही जागांवर भाजपला पराभव पत्करावा लागला आहे.

याप्रमाणे शिवसेना उबाठा पक्ष भाजपला राजकीय आव्हान देण्यासाठी सज्ज झाला आहे.असे आजच्या निकालात सिद्ध झाले आहे.

# लोकसहभागातून सारसोळे जेट्टी परिसरात प्रभावी स्वच्छता मोहीम

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०९, नवी मुंबई :** स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ अंतर्गत स्वच्छता विषयक विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात झाली असून आज रविवारच्या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी नवी मुंबई महानगरपालिका आणि एन्व्हायरमेंट लाइफ फाऊंडेशन, मॅनग्रुव्हज सोल्जर या संस्थांच्या व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पाम बीच रस्त्यानजीक सारसोळे जेट्टी लगत असलेल्या खाडीकिनारी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रशांत नेरकर, नेरूळ विभागाच्या सहाय्यक आयुक्त अनुराधा बाबर, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्या नियंत्रणाखाली उपमुख्य स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर, स्वच्छता अधिकारी अरुण पाटील यांनी आपले सहकारी स्वच्छता निरीक्षक विजय नाईक व नवनाथ ठोंबरे व उपस्वच्छता निरीक्षक यांच्यासह लोक सहभागातून ही मोहीम यशस्वीरीत्या राबवली. सारसोळा जेट्टी लागत असलेल्या खाडीकिनारी उत्साहाने संपन्न झालेल्या या विशेष स्वच्छता मोहिमेत एन्व्हायरमेंट लाईफ फाउंडेशनचे अध्यक्ष धर्मेश बराई, मँग्रोज सोल्जरचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांच्यासोबत कर्मवीर भाऊराव पाटील मॉडर्न कॉलेज वाशी, एसआयईएस कॉलेज नेरूळ, एस के कॉलेज नेरूळ, एमजीएम कॉलेज कळंबोली, सरस्वती कॉलेज खारघर, रामशेठ ठाकूर कॉलेज पनवेल, ए सी पाटील कॉलेज पनवेल, जनार्दन भगत शिक्षण संस्था कॉलेज पनवेल या प्रतिथयश महाविद्यालयांतील २०० हून अधिक एनएसएसचे विद्यार्थी व स्वच्छतादूत सक्रिय सहभागी होते. यावेळी २५० हून अधिक गोणी प्लास्टिक बॉटल, थर्माकोल असा कचरा काढून घेण्यात आला. यावेळी स्वच्छ सर्वेक्षणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले तसेच स्वच्छतेची सामूहिक शपथ ग्रहण करण्यात आली.

# थोडक्यात

## आंबेडकरी शाहिरीचा बुलंद आवाज शांत; लोकशाहीर प्रसाद अंतरवेलीकर यांचे निधन




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०९, विंचूर (नाशिक) :** महाराष्ट्रातील ख्यातकीर्त 'लोकशाहीर'प्रसाद अंतरवेलीकर(शिवप्रसाद सदाशिव गांगुर्डे, वय ७४) यांचे ७ फेब्रुवारी रोजी निधन झाले. आंबेडकरी विचारांच्या प्रबोधन चळवळीत आपल्या लेखणीने आणि पहाडी आवाजाने शाहिरी परंपरा जिवंत ठेवणारा एक निष्ठावंत कलावंत काळाच्या पडद्याआड गेला आहे.

कलाप्रवास आणि योगदान

निफाड तालुक्यातील अंतरवेलीया छोट्याशा गावातून वयाच्या १० व्या वर्षी सुरू झालेला त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे.

कलापथकांची स्थापना :- १९७० मध्ये 'किसान कलापथक' स्थापन केले, त्यानंतर ओझरच्या 'लोकरंजन' कलापथकात ते सक्रिय झाले.अष्टपैलू लेखन:भावगीते, लोकगीते, लावणी, पोवाडा, लोकनाट्य आणि चित्रपटांच्या पटकथा-संवादांचे लेखन त्यांनी केले.

प्रभावी अभिनय :- दूरदर्शनवरील कार्यक्रम आणि चित्रपटांत त्यांनी काम केले. विशेषतः 'खलनायकाची' भूमिका ते समर्थपणे पेलत असत.सांस्कृतिक वारसा:प्रल्हाद शिंदे आणि विठ्ठल उमप यांसारख्या दिग्गज कलावंतांसोबत त्यांनी अनेक कार्यक्रम गाजवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आधारित त्यांचा'असे होते बाबा'हा जलसा प्रचंड लोकप्रिय ठरला. शेती आणि मातीशी अतूट नातंदिवंगत निळू फुले यांच्यासह अनेक मोठ्या कलावंतांनी त्यांना चित्रपटसृष्टीत येण्याची संधी दिली होती. मात्र, चंदेरी दुनियेत गेलो तर माझ्या मातीपासून दूर जाईनअसे म्हणत त्यांनी ती ऑफर नाकारली आणि शेवटपर्यंत ग्रामीण संस्कृतीशी नाते जपले.

महत्त्वाच्या कलाकृती गाजलेला पोवाडा :- त्यांनी लिहिलेला 'महाराणा प्रताप' यांचा पोवाडा शाहीर विजय तनपुरे यांनी घराघरात पोहोचवला.

साहित्य संपदा :- नुकतेच त्यांचे'तमाशाचा तमाशा'हे संशोधनात्मक पुस्तक प्रकाशित झाले होते. त्यांची एक ग्रामीण कादंबरी प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

राजकीय सभांचे आकर्षण :- यशवंतराव चव्हाण, शरद पवार आणि छगन भुजबळ यांच्या सभांपूर्वी होणाऱ्या सादरीकरणात अंतरवेलीकर प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करत असत.

निरोप :- त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली असा मोठा परिवार आहे. अंतरवेली येथे शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. राजकीय, सामाजिक आणि कला क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांना अखेरची मानवंदना दिली.

## सहाशे विद्यार्थ्यांनी सादर केलेला नेत्रदीपक नाट्यप्रयोग : वंद्य वंदे मातरम्



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** इतिहास म्हणजे फक्त तारखा आणि सनावळी नाही तर ती देशभक्तीची गाथा आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील १८५७ ते १९४७ या नव्वद वर्षांच्या धगधगत्या कालखंडात असंख्य घटना घडल्या. १८५७ चा राष्ट्रीय उठाव ही १९४७ च्या स्वातंत्र्याची नांदी होती. हाच काळ महानाट्याच्या माध्यमातून सादर केला. लोकमान्य टिळक स्मारक मंडळाद्वारा संचालित लोकमान्य टिळक विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, लोकमान्य टिळक कन्या विद्यालय आणि लोकमान्य टिळक ज्ञान मंदिरच्या विद्यार्थ्यांनी. दि.०७ फेब्रुवारी २०२६ ला लोकमान्य टिळक विद्यालयाच्या शाखा इमारतीच्या भव्य प्रांगणात या नाटकाचा प्रयोग सादर झाला आणि प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. तब्बल सहाशे विद्यार्थी या नाटकात सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांना आपल्या स्वातंत्र्य संग्रामाची ओळख अभ्यास म्हणून नव्हे, तर आपल्या पूर्वजांची कहाणी म्हणून व्हावी आणि स्वातंत्र्याचे खरे मोल समजावे यासाठी हा उपक्रम स्मारक मंडळाने राबवला होता.लोकमान्य टिळकांच्या चतु:सूत्रीतील राष्ट्रीय शिक्षणाच्या विचारांना अनुसरणारी ही संस्था आता सर्वश्रुत आहे. या आधीही संस्थेने क्रीडा, विज्ञान आणि साहित्य या विषयांवर भव्य उपक्रम राबवले आहेत. 'वंद्य वंदे मातरम्' असे या महानाट्याचे शीर्षक होते. बंकिमचंद्र चटर्जी यांनी रचलेल्या वंदे मातरम् या गीताला दीडशे वर्ष पूर्ण झाली. वंदे मातरम् हा स्वातंत्र्य लढ्यात सहभागी क्रांतीकारकांना स्फूर्ती देणारा मंत्र होता. त्यामुळे तो प्रत्येक भारतीयाला वंदनीयच आहे. या नाटकात १८५७ च्या उठावाचे तत्कालीन कारण, त्या आधीची सामाजिक व राजकीय परिस्थिती, भारतभूमिचा गौरवशाली इतिहास सादर करून मंगल पांडे, झाशीची राणी, टिळक युग, गांधी युगासोबतच, चापेकर बंधू , सावित्रीबाई फुले, मदनलाल धिंग्रा, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, जालियानवाला बाग हत्याकांड, असहकार चळवळ, वंगभंग, चले जाव, सायमन कमिशन, चवदार तळ्याचा सत्याग्रह, दांडीयात्रा, आझाद हिंद सेना या महत्वाच्या घटनांचा समावेश तर होताच, यासोबतच चंद्रपूरचे गोंड क्रांतिकारक शहीद बाबुराव शेडमाके, चिमूर क्रांतीत महत्वाचे योगदान देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनातील दृश्येही नाट्यरूपात सादर झाली. २०२५ हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष असल्याने नाटकाच्या माध्यमातून डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी केलेली संघाची स्थापन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणून केलेले नामकरण आणि जंगल सत्याग्रह या घटनांचे नाट्यरूपांतर विद्यार्थ्यांनी सादर केले. ध्वनी प्रकाश, संगीत आणि पडद्यावर दिसणारी छायाचित्रे व चित्रफितींच्या सहाय्याने हा प्रयोग उत्तरोत्तर रंगत गेला. सुमारे पाच हजार प्रेक्षक या प्रयोगाला उपस्थित होते. लोकमान्य टिळक स्मारक मंडळाचे अध्यक्ष व ज्येष्ठ विधिज्ञ रवींद्र भागवत, सचिव गांगेय सराफ तसेच संपूर्ण व्यवस्थापक मंडळाचे पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे माजी अध्यक्ष , माजी खासदार हंसराज अहिर, आ.किशोर जोरगेवार, चांदा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अशोक जीवतोडे, महर्षी विद्या मंदिराचे अध्यक्ष गिरीश चांडक, चंद्रपूरचे उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) मनोज गौरकार तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक तुषार देवपुजारी यांची विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी लोकमान्य टिळक विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले.